कला अकादमी गोवा
कांपाल - पणजी
कअ/काविवि/ति.दि/२०२५-२६/४००
दि.१९/०५/२०२५

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी गोवा व तियात्र अकादमी गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने तियात्र दिवस बुधवार दि. २१ मे २०२५ रोजी सायं. ४.०० वा. दिनानाथ मंगेशकर सभागृहात आयोजित करण्यात येणार आहे. या समारंभासाठी गोवा राज्याचे कला व संस्कृती मंत्री तसेच कला अकादमीचे अध्यक्ष श्री. गोविंद गावडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून तियात्र अकादमीचे अध्यक्ष अँथोनी बार्बोसा यांची उपस्थिती याप्रसंगी लाभणार आहे.

तियात्र दिनाचे औचित्य साधून यंदा कला अकादमीच्या तियात्र स्पर्धेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्या कारणाने त्या संदर्भात एका खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमा अंतर्गत मागच्या ५० वर्षाच्या स्पर्धेत ज्या संस्थानी सादरीकरणाचे प्रथम पारितोषिक प्राप्त केले आहे अशा संस्थांचा यथोचित गौरव तसेच या स्पर्धेत विविध अंगानी ज्या कलाकारांनी योगदान दिले आहे अशा ५० निवडक कलाकारांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

गोव्याच्या भुमिला प्रदिर्घ अशी तियात्र परंपरा लाभलेली आहे. या परंपरेला वैभव संपन्न करण्यात कला अकादमीच्या तियात्र स्पर्धेचे मोठे योगदान राहिले आहे. तरी तियात्र कलाकारांनी व तियात्रप्रेमी रसिकांनी या कार्यक्रमासाठी मोठया संख्येने उपस्थित राहून उपकृत करावे असे कला अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूं ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)